# राजापूर–कोंढे घराणे

राजापूर हे शहर रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. ते मुंबई गोवा महामार्गावर मुंबईपासून ४०० किलोमिटर अंतरावर आहे. रत्नागिरी या जिल्ह्याच्या ठिकाणापासून ७६ कि. मी. अंतरावर आहे. राजापूर हे इतिहास प्रसिद्ध व्यापारी शहर आहे. इथे पूर्वी इंग्रजी व फ्रेंच वखारी होत्या, तसेच पोर्तुगीजांचीही वखार होती. या वखारींची इमारत अजूनही तेथे जीर्णावस्थेत उभी आहे. या शहराजवळून अर्जुना नदी वाहते. त्याशिवाय दुसरीही एक नदी—गोडी नदी—राजापूर शहरातून वाहते. या दोन नद्यांचा संगम या ठिकाणी होतो. त्या दृष्टीने राजापूर हे संगमावर वसलेले शहर आहे. पूर्वी राजापूर खाडीतून म्हणजे अर्जुना नदीतून व पुढे समुद्रमार्गे मोठा व्यापार चालत असे. देशावरील(घाटावरील) हळद वगैरे माल राजापूरला येऊन खाडीमार्गे व समुद्रमार्गे पुढे जात असे. त्यामुळे अजूनही चांगल्या हळदीला व चांगल्या खोबऱ्याला राजापूरी हळद, राजापूरी खोबरे असा शब्दप्रयोग वापरला जातो. राजापूरी पंचेहि प्रसिद्ध आहेत. परंतु राजापूरमधे हातमाग नाहीत. कदाचित फार पूर्वी असावेत. पण त्यासंबंधी माहिती उपलब्ध झाली नाही. शिवाजी महाराजानीही या शहराला भेट दिल्याचा इतिहासांत उल्लेख आहे.

येथून जवळच उन्हाळे येथे गरम पाण्याचे झरे आहेत. तेथे नगरपालिकेतर्फे स्नानाकरिता कठडे वगैरे बांधून पुरूष व स्त्रियांकरिता वेगवेगळी व्यवस्था केली आहे.

उन्हाळे येथून डोंगर चढून गेल्यानंतर डोंगर माथ्यावर सुप्रसिद्ध गंगातीर्थ आहे. गंगातीर्थ येथे काळया दगडाने पक्की चौदा कुंडे बांधलेली आहेत. मूळ कुंड वडाचे बुंध्यापाशी असून तेथून गंगा प्रवाह सुरू होतो. चौदा कुंडातून फिरल्यानंतर गोमुखातून गंगाप्रवाह बाहेर पडतो. साधारणपणे तीनचार वर्षांनी गंगा अवतीर्ण होते. मध्यंतरी १०/१५ वर्षे खंड पडला होता. गंगा आल्यानंतर इथे फार मोठी यात्रा भरते.

राजापूर येथून जवळ श्री धूतपापेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर व मंदिराचा परिसर फार प्रेक्षणीय आहे.

पूर्वी उन्हाळे, गंगा, धूतपापेश्वर या ठिकाणी पायी जावे लागत असे. आता बस व रिक्षाने जाता येते.

अर्जूना नदीपलिकडे कोंढे (कोंढ्याची तड) हे गांव आहे. येथे अभ्यंकरानी येऊन वस्ती केली. या मूळगांवाहून चरितार्थासाठी बरेच बंधू बाहेर गेले. व तेथेच स्थायिक झाले. त्या सर्वांकडून आलेल्या माहितीनुसार तीन घराणी दाखविली आहेत. ती अशी-

१) राजापूर—कोंढे घराणे
२) राजापूर—कोंढे—डहाणू (दत्तक) घराणे
३) राजापूर—कोंढे—लिंबगोवा—अकोला घराणे

याशिवाय आडिवरे, राजापूर येथूनहि कांही अभ्यंकराची माहिती आली आहे. परंतु त्याची जोडणी वरील अभ्यंकर घराण्याशी करता आली नाही. त्यामुळे ती माहिती वेगळी घराणे क्रमांक ४ म्हणून दाखविली आहे.

**कुळधर्म कुळाचार**—या घराण्यातील कुटुंबात खालील कुळाचार पाळले जातात.

१) बोडण—साधारणतः प्रत्येक कुटुंबात वर्षातून एकदा बोडण घातले जाते. तसेच काही मंगलकार्य झाल्यावर बोडण घालण्याची पद्धत आहे.

२) गोंधळ—लग्न, मुंज वगैरे मंगलकार्य झाल्यानंतर गोंधळ घालण्याची प्रथा आहे.

३) महालक्ष्मी—आश्विन शुद्ध ८ मीस श्री महालक्ष्मीची पूजा करून रात्री घागरी फुंकून जागविण्याची प्रथा आहे. नववधूचे पहिल्या पांच वर्षात अशी पूजा करण्याची पद्धत आहे.

## घराणे क्रमांक १

## राजापूर–कोंढे घराणे

## राजापूर – लिंब – कोल्हापूर – ठाणे – वसई – मुंबई

१/१ **अनंत**–हा या घराण्याचा मूळ पुरूष. बाळाजी विश्वनाथ भट (पेशवे) यांची पत्नी राधाबाई ही नेवरे (ता. रत्नागिरी) येथील श्री बर्वे यांची कन्या. बाळाजी विश्वनाथ भट पुढे पेशवे झाल्यावर पुणे येथे राहू लागले. त्यामुळे राधाबाईना नेवरे हे माहेर फार लांब वाटू लागले. प्रवासहि त्रासाचा होता. म्हणून त्यानी पेशव्यांकडून आपले माहेरचे कुटुंब श्री बर्वे यांचेकरिता लिंब (जि. सातारा) हे गांव आंदण देवविले. त्याप्रमाणे बर्वे कुटुंब लिंबला गेले. जातांना त्यानी कांही कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबे बरोबर नेली. त्यापैकी एक कुर्ध्याचे अभ्यंकर होते. हे अभ्यंकर कुटुंब लिंब (जि. सातारा) येथे राहू लागले. अजूनहि त्यांचे वंशज लिंब येथे राहात आहेत. या लिंब गावाजवळच नदीपलिकडे गोवा नावाचे गाव आहे. त्यामुळे पुष्कळदा या गावाचा उल्लेख लिंब–गोवा असा करतात.

या कुटुंबातील अनंत नावाचे गृहस्थ धुळपांकडे नोकरीला होते. कोंढे हे गांव पूर्वी श्री. प्रभुदेसाई यांचे वतनी गांव होते. पण गांव नापिक व वस्तीहि नव्हती म्हणून श्री. प्रभुदेसाई ह्यानी वतन सोडून दिले होते. अनंत अभ्यंकर यानी हे गांव धुळपांकडून संपादन केले. वस्ती वाढविली, पीकपाणी चालू केले. हे अनंत हेच या घराण्याचे मूळ पुरूष. यांना गोपाळ व नारायण या नावाचे दोन पुत्र होते. या दोघांचे वंशज आजही या ठिकाणी वस्ती करून आहेत. इ.स. १९१३ मधे कोर्टामार्फत या दोन शाखांचे वाटप झाले. कोंढे हे गांव आता राजापूर म्युनिसिपल हद्दीत समाविष्ट आहे. या गांवाला बोलीभाषेत 'कोंड्याची तड' असेही संबोधिले जाते. राजापूर व कोंढे यांचे मधून अर्जुना नदी वाहते. व्यवसायाचे सोईचे दृष्टीने पद्माकर महादेव, चंद्रकांत पद्माकर, आनंद पद्माकर, हणमंत गणेश, अरविंद सदाशिव, सुधीर हणमंत, प्रमोद हणमंत, जयंत हणमंत वगैरे राजापूर शहरांत वस्ती करून आहेत. माधव सदाशिव हे कोंढे येथे राहतात.

नारायण यांचे वंशजापैकी पाचव्या पिढीतील विष्णू यास तीन पुत्र होते. त्यांची नावे १)कृष्णा २) श्रीधर ३) विनायक. यापैकी कृष्णा हा डहाणूचे व्यापारी रामचंद्र अभ्यंकर याना दत्तक गेला. डहाणूचे रामचंद्र यांचे मूळ कुटुंब त्रिंबकेश्वर (जि. नाशिक) येथील आहे. चिमाजी अप्पा पेशवे यांचेबरोबर त्रिंबकेश्वर येथील विष्णू हा वसईला आला. कालांतराने डहाणू येथे स्थायिक झाला. या विष्णूचा मुलगा महादेव व महादेवचा मुलगा रामचंद्र. या रामचंद्राला अपत्य नसल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे कोंढ्यापैकी कृष्णा हा दत्तक गेला. त्याचे दत्तक नाव नारायण. आजचे डहाणूचे अभ्यंकर हे या नारायणाचे वंशज. त्यांची वंशावळ व माहिती पुढे वेगळी दिली आहे.

अनंताचा पहिला मुलगा गोपाळ याने कोंढे येथे श्री सिद्धेश्वराची स्थापना केली व मंदिर बांधले. बंधू नारायण याने विजयदुर्गचे धूळप यांचेकडून मंदिराचे पूजा नैवेद्य वगैरेसाठी काही जमीन देवस्थानला इनाम मिळविली. आजहि कोंढे येथे सिद्धेश्वराचे मंदिर चांगल्या स्थितीत उभे आहे व जमीनही अजून देवस्थानचे नांवे चालू आहे.

लिंबगोवा येथून एक अभ्यंकर अकोला (विदर्भ) या ठिकाणी गेले. अकोला येथे त्यांचे वंशज राहात आहेत. त्यांची वंशावळी, माहिती अन्यत्र दिली आहे.

२/२ **गोपाळ अनंत**–यानी कोंढे येथे श्रीदेव सिद्धेश्वर याचे मंदिर स्थापन केले.

३/३ **श्रीधर गोपाळ**–हे कांही वर्षे लिंब येथे रहात होते. नंतर ते राजापूरास आले. यानी वयाच्या उत्तरार्धात संन्यास घेतला. त्यांची समाधी कोंढे येथे श्री सिद्धेश्वर मंदिरांचे आवारांत बांधलेली आहे.


४/४ **नारायण श्रीधर**–जन्म इ.स. १८३०, लिंब येथे. मृत्यू इ.स. १८९५. यांचा याज्ञिकी, जमाखर्च इ. चा अभ्यास होता.

भार्या : **लक्ष्मीबाई**–मृत्यू १९२५ चे सुमारास. माहेर–गंगाराम भिडे, सागवे (ता. राजापूर) यांची कन्या.

## घराणे क्रमांक १

## राजापूर-कोंढे घराणे

## राजापूर--ठाणे--मुंबई




कन्या :

१) **बायो**–सासर—विष्णू रानडे, विलये, ता. राजापूर.

त्यांचे वंशज विलेपार्ले मुंबई येथे रहातात.

२) रंगू–सासर—वासुदेव जोशी, करेल, ता. राजापूर

## घराणे क्रमांक १

## राजापूर-कोंढे घराणे

### राजापूर--कोल्हापूर--रत्नागिरी--वसई

पि. क्र. — व्य. क्र.

- १ — १अनंत
  - २ — २२नारायण
    - ३ — २३अनंत
      - ४ — २४सदाशिव
        - ५ — २५महादेव
          - ६ — २६गोविंद, २७पुरुषोत्तम
        - ५ — २८विष्णू
          - ६ — २९कृष्णा (द.गे.)
          - ६ — ३०श्रीधर
          - ६ — ३१विनायक
            - ७ — ३२विठ्ठल
              - ८ — ३३प्रसाद
              - ८ — ३४अरुण
        - ५ — ३५रामचंद्र
          - ६ — ३६नारायण ○
          - ६ — ३७गणेश
            - ७ — ३८सदाशिव
              - ८ — ३९अरविंद, ४०अशोक, ४१माधव
            - ७ — ४२अनंत
              - ८ — ४३अनिल, ४४अविनाश, ४५सुहास
            - ७ — ४६हणमंत
              - ८ — ४७सुधीर, ४८प्रमोद, ४९जयंत
            - ७ — ५०वासुदेव
            - ७ — ५१दामोदर
              - ८ — ५२अतुल, ५३शरच्चंद्र
            - ७ — ५४परशुराम
            - ७ — ५५विष्णू
              - ८ — ५६गणेश, ५७चेतन
            - ७ — ५८श्रीकृष्ण
        - ५ — ५९वासुदेव
          - ६ — ६०भिकाजी ○
        - ५ — ६१सखाराम ○
        - ५ — ६२अनंत
          - ६ — ६३गोपाळ ○
          - ६ — ६४पांडुरंग
            - ७ — ६५प्रभाकर
              - ८ — ६६प्रशांत
            - ७ — ६७मधुकर ○
            - ७ — ६८विश्वास
              - ८ — ६९विराज


त्यांचे वंशज बडोदे येथे रहातात.
३) **तारा**–सासर—रामकृष्ण ताम्हनकर,सौंदाळे, ता. देवगड. त्यांचे वंशज सौंदाळे येथे राहात आहेत.



कै. श्री. महादेव नारायण

५/५ **महादेव नारायण–जन्म** इ.स. १८७० चे सुमारास. मृत्यू १९३४. व्यवसाय—राजापूर येथे मामलेदार कचेरीत मुखत्यार वकील म्हणून काम करीत. ब्रिटीश राजवटींत खोती वतनासंबंधी सरकारमार्फत चौकशी झाली होती. त्यासंबंधीचे कागदपत्र याना इ.स. १९१७ चे सुमारास पाहाण्यास मिळाले. त्यावरून कोंढे गांवची खोती शिवाजी महाराजांचे पूर्वीपासून अभ्यंकर कुटुंबाकडे चालत आहे असे दिसते. वंशपरंपरा खोती अभ्यंकरांकडे सन १९४८ पर्यंत चालू होती.
महादेव नारायण अनेक वर्षे कोंढे गांवचे पोलिस पाटील होते.
भार्या : **गंगाबाई**–मृत्यू १९६५. माहेर—शिवराम आपटे. देवाचे गोठणे. (राजापूर) यांची कन्या.
कन्या :
**१) कृष्णाबाई**–जन्म १९०४. मृत्यू १९८०. सासर—रुक्मिणीबाई अनंत बर्वे. ओटवणे. ता. सावंतवाडी. यांचे वंशज ठाणे (पूर्व) येथे रहात आहेत.


२) **येसुबाई**–जन्म १२ ।३ ।१९१४. सासर—लक्ष्मीबाई नारायण जोशी. वास्तव्य—जोशीवाडा, खारकर आळी, ठाणे.



श्री. पद्माकर महादेव

६/६ **पद्माकर महादेव**–जन्म ११ ।९ ।१९०८ रोजी कोंढे येथे झाला. शिक्षण— बी. ए; एल्एल्. बी. (मुंबई) व्यवसाय—इ.स.१९३५ पासून राजापूर (जि. रत्नागिरी) येथे वकिली व्यवसाय करीत आहेत. राजापूरला पूर्वी म्युनिसिपालिटी नव्हती. ती स्थापन करण्यांत यांचा मोठा हातभार होता. गांधीवधानंतर १९४८ साली काही काळ तुरूंगवास भोगला. वास्तव्य—शिवाजीनगर, राजापूर.
भार्या : **मंदाकिनी**–जन्म १ ।८ ।१९१८. मृत्यू १८ ।८ ।१९८८. माहेर—कुसुम परशुराम करमरकर, नेवरे (ता.रत्नागिरी) याना गायन, वादन व समाजसेवेची आवड होती. कांही वर्षे राजापूर नगरपालिकेत सभासद.
कन्या :
**जयश्री (रोहिणी)** –जन्म ३१ ।५ ।१९५६. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, सावंतवाडी येथे नोकरी. सासर—धनश्री दिलीप सातवळेकर, सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग).
७/७ **चंद्रकान्त (अरूण) पद्माकर**–जन्म १९ ।६ ।१९४५ कोंढे येथे. शिक्षण—बी. ए; एल्एल्. बी. व्यवसाय—वकिली. वास्तव्य—शिवाजीनगर राजापूर. समाजकार्य व राजकारणाची आवड.


भार्या : **अपर्णा**–जन्म १७ ।१० ।१९५१. माहेर–रजनी पुरूषोत्तम जोशी, दापोली.
कन्या :
**अनुप्रिता**–जन्म २० ।११ ।१९७९. शिकत आहे.
८/८ **अद्वैत चंद्रकान्त**–जन्म २२ ।११ ।१९७४. शिकत आहे.
९/८ **अभिजित चंद्रकान्त**–जन्म २० ।२ ।१९७६. शिकत आहे.
१०/७ **श्रीधर (रमेश) पद्माकर**–जन्म १२ ।७ ।१९४८ कोंढे ता. राजापूर येथे. शिक्षण–एम्. बी. बी. एस्., (पुणे), एम्. डी., एफ्. ए. सी. ओ. जी. (अमेरिका.) व्यवसाय–स्वतःचा डॉक्टरीचा व्यवसाय. अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया राज्यामध्ये इंडियाना या गावी स्वतःचे मालकीचा बंगला व हॉस्पिटल आहे. वास्तव्य–८५, लिंडा लेन, इंडियाना, पेनसिल्व्हानिया पी. ए. १५७०१ यू. एस. ए. (अमेरिका) संगीत, वाचन, फोटोग्राफी यांची आवड. १९७६ पासून अमेरिकेत वास्तव्य.
भार्या : **कल्पना–जन्म** १९ ।३ ।१९५० रत्नागिरी. माहेर–कल्पना मंगेश तोरगळकर, रत्नागिरी. शिक्षण–बी. एस्सी. प्रथम वर्ग. अमेरिकेत वास्तव्य.
कन्या :
१) **पल्लवी**–जन्म ७ ।६ ।१९७३. शिकत आहे. वास्तव्य–अमेरिका.
२) **राधा (थेल्मा)** –जन्म ७ ।५ ।१९७८. शिकत आहे. वास्तव्य–अमेरिका.
१०अ/८ **केदार श्रीधर**–जन्म ४ ।२ ।१९८४. शिकत आहे. वास्तव्य–अमेरिका.
११/७ **आनंद पद्माकर**–जन्म ७ ।३ ।१९५१. कोंढे शिक्षण–बी. ए. व्यवसाय–सार्वजनिक बांधकाम खाते–खारेपाटण जि. सिंधुदूर्ग येथे नोकरी. वास्तव्य–१५१२ शिवाजीनगर, राजापूर (जि. रत्नागिरी). भार्या : **अनुपमा**–जन्म ८ ।५ ।१९५८. माहेर–प्रमिला वामन पाध्ये रा. भू ता. राजापूर.
१२/६ **रामकृष्ण महादेव–जन्म** १७ ।१० ।१९२१. कोंढे. शिक्षण–एम्. डी. (मुंबई), डी. सी. एच्.,मुंबई. व्यवसाय–महाराष्ट्र राज्य शासनातून जिल्हा सिव्हिल सर्जन म्हणून १९७९ साली निवृत्त. वास्तव्य–अ. ७. मानस सोसायटी, नौपाडा, ठाणे ४०० ६०२. निवृत्तीपूर्वी मालेगांव (नाशिक), अमरावती. अहमदनगर, जे. जे.हॉस्पीटल, मुंबई, ठाणे इत्यादि ठिकाणी नोकरी. निवृत्तीनंतर ठाणे येथे वास्तव्य. समाजकार्याची आवड. अभ्यंकर कुलवृत्तांत समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात.
भार्या : **सुनंदा**–जन्म २२ ।६ ।१९२९ वाई (जि. सातारा). शिक्षण–बी. ए., नर्सिंगची पदविका प्रथम क्रमांकाने पास. माहेर–इंदू गोपाळ देवल. वाई जि. सातारा.
कन्या : **चंद्रलेखा**–जन्म १७ ।७ ।१९६० वाई (सातारा.) बी. एस्सी. बँक ऑफ बरोडा मधे नोकरी.
सासर–अपर्णा भालचंद्र जोशी, कल्याण.



डॉ. रवीन्द्र रामकृष्ण

१३/७ **रवीन्द्र रामकृष्ण–जन्म** १३ ।१० ।१९५१ वाई (जि. सातारा). शिक्षण–एम्. डी., डी. पी. एम्.; एम्. एन्. ए. एम्. एस्.; एफ्. आय. पी. एस्.
व्यवसाय–मानसोपचार तज्ञ. मनोविकार तज्ञ. शीव (मुंबई) येथे स्वतःचे हॉस्पिटल. वास्तव्य–४ब/७ संघमित्र सोसायटी, चुनाभट्टी, मुंबई ४०००२२. एम. डी. परीक्षेत मुंबई विद्यापिठात सुवर्णपदक. सिंगापूर, मलेशिया, बँकॉक, युरोप इत्यादि ठिकाणी प्रवास.

व्यावसायिक परिषदांमधून अनेक प्रबंध वाचन. कांही प्रबंध बक्षिस—पात्र. आकाशवाणी व दूरदर्शनवर आरोग्यविषयक कार्यक्रमामधे सहभाग. मुंबई सायकियाट्रिक सोसायटीचे भूतपूर्व अध्यक्ष. अखिल भारतीय सायकियाट्रिक सोसायटी (पश्चिम विभाग) चे अध्यक्ष. अखिल भारतीय सायकियाट्रिक सोसायटीचे कार्यकारिणी सभासद.
भार्या : **सुचेता**—जन्म २१ ।११ ।१९५३. बी. ए., एलूएल्. बी., पश्चिम रेल्वेत बॅडमिंटनपटू म्हणून लग्नापूर्वी नोकरी. आता व्यवसाय वकीली.
माहेर—सुचेता गणेश काजळे. हिंदू कॉलनी, दादर, मुंबई.
१४/८ **संतोष रवीन्द्र**—जन्म २३ ।२ ।१९८२. मुंबई येथे. शिकत आहे.
१५/८ **आदित्य रवीन्द्र**—जन्म १८ ।१ ।१९८४. मुंबई येथे. शिकत आहे.



**श्री. राजेन्द्र रामकृष्ण**

१६/७ **राजेन्द्र रामकृष्ण**—जन्म १० ।१२ ।१९५४ वाई (सातारा.) शिक्षण—एम्. एस्सी., एलूएल्. बी. (मुंबई). व्यवसाय—मुंबई हायकोर्ट आणि ठाणे जिल्हा कोर्ट येथे वकीली. वास्तव्य—अ७, मानस सहनिवास, कोपरी रोड, नौपाडा ठाणे—२. सामाजिक कार्यात रस. ठाणे लायन्स क्लबचे उत्साही सभासद. गिर्यारोहणाची आवड.
भार्या : **निरुपमा**—जन्म ४ ।८ ।१९६० शिक्षण—बी. ए. रिझर्व बँक मुंबई येथे नोकरी. माहेर— निरुपमा बाळकृष्ण प्रधान. वान्द्रे.

१७/८ **प्रसन्न राजेन्द्र**—जन्म १९ ।५ ।१९८३ मुंबई येथे. शिकत आहे.
१८/५ **अनंत नारायण**—जन्म १८८० चे सुमारास. मृत्यू १९४६. व्यवसाय—बडोदे संस्थानात खासगीकडे नोकरी. वास्तव्य—बडोदे येथे असे.
भार्या : **यमुना**—मृत. माहेर—सहस्रबुद्धे, बडोदे.
कन्या : **बेबी**—जन्म १९४० चे सुमारास.
सासर—शालिनी शरदच्चंद्र दातार, बडोदे.
१९/५ **शिवराम नारायण**—जन्म १८८५ चे सुमारास. मृत्यू १९५२. व्यवसाय—शेती. वास्तव्य—कोंढे (ता. राजापूर) येथे असे.
भार्या : **सरस्वती**—मृत. माहेर—व्यंकटेश जोगळेकर, हेदवी (ता. गुहागर) यांची कन्या.
२०/६ **शंकर शिवराम**—जन्म १९२४. व्यवसाय—कांही काळ टाटा मिल, मुंबई, येथे नोकरी. वास्तव्य—राजापूर.
भार्या : १) **सुलभा**—मृत्यू १९६४. माहेर—सुभद्रा रामचंद्र फडके, पावस.
२) **सुलभा**—माहेर—प्रमिला दत्तात्रय शास्त्री, दादर, मुंबई.
२१/७ **मंगेश शंकर**—जन्म १९६८. अविवाहित. शिक्षण—मॅट्रिक. वास्तव्य—मुंबई.
२२/२ **नारायण अनंत**—यानी विजयदुर्गचे धुळप यांचेकडून कांही जमीन कोंढे येथील सिद्धेश्वराचे पूजा नैवेद्य वगैरे साठी इनाम मिळविली होती.
२३/३ **अनंत नारायण**— #
२४/४ **सदाशिव अनंत (द.आ.)** —वयाचे ७५व्या वर्षी मृत्यू. हे कालवी ता. देवगड येथील मराठे कुटुंबातून दत्तक आले.
२५/५ **महादेव सदाशिव**— #
२६/६ **गोविंद महादेव**— #
२७/६ **पुरुषोत्तम महादेव**—अकोला नागपूरला वास्तव्य. व्यवसाय—शिवण काम. निवृत्तीनंतर कोंढे येथे वास्तव्य होते. अविवाहित होते.
२८/५ **विष्णू सदाशिव**— #
२९/६ **कृष्णा विष्णू**—(द. गे.) हा डहाणूचे रामचंद्र अभ्यंकर यांना दत्तक गेला. दत्तक नाव नारायण. यांची डहाणूची वंशावळ वेगळी दिली आहे.
३०/६ **श्रीधर विष्णू**— #
३१/६ **विनायक विष्णू**—जन्म १८८४. मृत्यू

१६ ।१२ ।१९४४.
भार्या : **रमाबाई**–माहेर–रमाबाई कृष्णाजी जोशी.
कन्या : **कृष्णाबाई**–सासर–सुधा भार्गव बेहेरे.
३२/७ **विठ्ठल विनायक**–जन्म २५ ।७ ।१९१६ गिरगांव, मुंबई व्यवसाय–आयकर खात्यांत नोकरी. १९७४ मधे निवृत्त. वास्तव्य–श्रीरामविजय कॉलनी, राममंदिर, मु.पो. पापडी, ता. वसई जि. ठाणे ४०१ २०७.
भार्या : १) **विमलाबाई**–(मृत) माहेर–यमुना वासुदेव सोमण.
२) **चारुशीला**–माहेर–इंदुमती.
३३/८ **प्रसाद विठ्ठल**–जन्म ३ ।१० ।१९५०. शिक्षण–एस्. एस्. सी., पास. व्यवसाय–खाजगी नोकरी. वास्तव्य–ए-१ भागीरथी अपार्टमेंट बि. नं. ३ गुप्ते रोड, डोंबिवली (प.)
भार्या : १) **प्रज्ञा**–
२) **प्रेरणा**–माहेर–कुसुम सहदेव काळे, नाशिक.
३४/८ **अरूण विठ्ठल**–जन्म ११ ।११ ।१९५८. शिक्षण–मेकॅनिकल ड्राफ्टसमन
व्यवसाय–नोकरी–टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स, प्रभादेवी. वास्तव्य–यशोधाम, बी४, ब्लॉक नं. ४०२, गोरेगांव(पूर्व), मुंबई ४०० ०६३.
भार्या : **स्मिता**–माहेर–स्मिता वर्दे.
पुत्र–**प्रशांत**–शिकत आहे.
३५/५ **रामचंद्र सदाशिव**– #
३६/६ **नारायण रामचंद्र**–जन्म १८७५. मृत. व्यवसाय–व्यापार. राजापूर बाजार पेठेत यांची दलाली पेढी फार प्रसिद्ध होती. वास्तव्य–कोंढे ता. राजापूर येथे असे.
भार्या : **लक्ष्मी**–
कन्या :
१) **कृष्णाबाई**–सासर–देवधर, कोकिसरे.
२) **बयोबाई**–सासर–महादेव गाडगीळ, सायने, ता. देवगड.
३) **सुंदराबाई**–सासर–विनायक राजवाडे, देवरूख. तरूणपणात मृत्यू.
३७/६ **गणेश रामचंद्र**–जन्म १८८४. मृत्यू १९३५. यांचा वैद्यकशास्त्राचा चांगला अभ्यास होता. व्यवसाय–वैद्यकी, शेती, पिठाची व तेलाची गिरणी. रत्नागिरी जिल्ह्यातील नामांकित यांत्रिक होते. नाविन्याची व प्रयोग करण्याची आवड. वास्तव्य–कोंढे ता. राजापूर.
भार्या : १) **सरस्वती**–माहेर–अंबिका विष्णू लेले, मुटाट, ता. देवगड, जि. रत्नागिरी. मृत.
प्रथम भार्येची कन्या : **भीमा**–जन्म १९२३.
सासर–सुशिला जयराम फाटक, वास्तव्य–पुणे.
भार्या : २) **आनंदीबाई**–हयात. जन्म सन १९०७ माहेर–चंद्रभागा दिनकर लेले. मुटाट, ता. देवगड.
द्वितीय भार्येच्या कन्या :
१) **गोदावरी**–सासर–कृष्णाजी वासुदेव कानिटकर. वास्तव्य–कोल्हापूर.
२) **प्रभावती**–सासर–भालचंद्र विनायक बर्वे.
३८/७ **सदाशिव गणेश**–जन्म १९१६. मृत्यू १९७०. शिक्षण–४ थी व्यवसाय–शेती व गिरणी व्यवसाय वास्तव्य–कोंढे ता. राजापूर.
भार्या : **सुमति**–माहेर–नारायण लक्ष्मण गोरे, अडिवरे.
कन्या : **शशिकला**–जन्म १९५०. सासर–पद्मजा पांडुरंग गाडगीळ. वास्तव्य–विलेपार्ले.
३९/८ **अरविंद सदाशिव**–जन्म १९४५. शिक्षण–बी. एस्सी., बी. ई. (इन्स्ट्रुमेनटेशन्) व्यवसाय–गिरणी, शेती, बागायती, धान्य दुकान, मशिनरी दुरूस्ती.
भार्या : **अनिता**–माहेर–काशी भिकाजी मराठे, तळकट, सावंतवाडी.
कन्या : **संगीता**–जन्म ३ ।१२ ।१९७१. शिकत आहे.
पुत्र–**आशुतोष**–जन्म १० ।३ ।१९७५. शिकत आहे.
४०/८ **अशोक सदाशिव**–जन्म १९४८. शिक्षण–बी. ए. एम्. एस्.; एम्. बी. बी. एस्.; एम्. एस्., व्यवसाय–वापी येथे हरिया हॉस्पिटलमधे सर्जन सुपरिटेंडेंट इनचार्ज. वास्तव्य–वापी (गुजराथ).
भार्या : **सोनल**–एम्. बी. बी. एस्.; डी. जी. ओ. माहेर–जयश्री बृजलाल दोशी, जामनगर.
कन्या :
१) **मीनल**–जन्म १९७८. शिकत आहे.
२) **शीतल**–जन्म १९८० शिकत आहे.
पुत्र–**विक्रमादित्य**–जन्म १९८७.
४१/८ **माधव सदाशिव**–जन्म १९५२. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–शेती, बागायती. वास्तव्य–कोंढे ता.

राजापूर.
भार्या : **गीता**–माहेर–विद्या वासुदेव जोगळेकर, हेदवी, ता. गुहागर.
कन्या :
१) **संपदा**–जन्म १९८२. शिकत आहे.
२) **विजयश्री**–जन्म १९८६. शिकत आहे.
पुत्र–**चंद्रशेखर**–जन्म १९७९.
४२/७ **अनंत गणेश**–जन्म २६ ।१२ ।१९१८ कोंढे येथे. शिक्षण–नॉनमॅट्रिक. व्यवसाय–१९४८ पर्यंत स्टेशनरी वगैरेचे दुकान. नंतर कोल्हापूर इंजि. वर्कशॉप कास्टिंग फौन्ड्री मधे नोकरी. वास्तव्य–६८२ शाहूपुरी, ३री गल्ली, कोल्हापूर १.
भार्या : **शोभा**–माहेर–शकुन्तला दत्तात्रय गोखले, विजयदूर्ग, जि. सिंधुदुर्ग.
४३/८ **अनिल अनंत**–जन्म १२ ।३ ।१९५०. शिक्षण–दहावी. व्यवसाय–नोकरी. वास्तव्य–पुणे. अविवाहित.
४४/८ **अविनाश अनंत**–जन्म १३ ।३ ।१९५१. शिक्षण–एस्. एस्. सी., व्यवसाय–सरकारी नोकरी–इरिगेशन खाते. फोटोग्राफीची आवड.
भार्या : **अंजली**–जन्म १९५३. माहेर–ललिता दामोदर रामनामे, इस्लामपूर.
कन्या : **अर्चना**–जन्म ७ ।३ ।१९७५. शिकत आहे.
४५/८ **सुहास अनंत**–जन्म १२ ।११ ।१९५२. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–के.डी.सी., बँकेत नोकरी. वास्तव्य–कोल्हापूर.
भार्या : **स्नेहल**–माहेर–मीना पोंक्षे, मिरज.
कन्या : **भक्ति**–जन्म १८ ।२ ।१९८७.
पुत्र–**अवधूत**–जन्म १९८९.
४६/७ **हणमंत गणेश**–जन्म ९ ।४ ।१९२१. शिक्षण–मराठी ५वी. व्यवसाय–जनरल स्टोअर्स, किराणा, हार्डवेअर, स्टेशनरीचा व्यापार. वास्तव्य–३१ बाजारपेठ, राजापूर जि. रत्नागिरी.
भार्या : **आशा**–माहेर–कमल प. ताम्हनकर, कुवेशी, ता. राजापूर.
४७/८ **सुधीर हणमंत**–जन्म २९ ।१० ।१९५३. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–व्यापार. जनरल स्टोअर्स.
भार्या : **अपर्णा**–माहेर–मीना पांडुरंग जोशी, इचलकरंजी.
कन्या : **स्वाती**–जन्म १९८२. पुत्र–**सुरेश**–जन्म १९८३.
४८/८ **प्रमोद हणमंत**–जन्म २४ ।६ ।१९५५. शिक्षण–जुनी एस्. एस्. सी. व्यवसाय–व्यापार. जनरल स्टोअर्स. वास्तव्य–राजापूर.
भार्या : **स्मिता**–माहेर–आशा पंढरीनाथ दामले, कोळंबे (रत्नागिरी).
कन्या : **केतकी**–जन्म २४ ।९ ।१९८९.
पुत्र–**अभिजित्**–जन्म ५ ।७ ।१९८५.
४९/८ **जयंत हणमंत**–जन्म १९६०. शिक्षण–बारावी. व्यवसाय–टी.व्ही. व फ्रीज शोरूम व विक्री, फोटो स्टुडिओ, लॉजिंग हाऊस. वास्तव्य–राजापूर.
भार्या : **मुग्धा**–माहेर–सुरेखा सखाराम करमरकर, संगमेश्वर, जि. रत्नागिरी
५०/७ **वासुदेव गणेश**–जन्म १९२४. मृत. वास्तव्य–पुणे येथे असे.
कन्या : **सुमन**–सासर–सुमन बा. विद्वांस. ५८/५, पर्वती दर्शन, पोलिस चौकीजवळ, पुणे ९.
पुत्र–**बंडोपंत**–वास्तव्य–पुणे.
५१/७ **दामोदर गणेश**–जन्म १२ ।९ ।१९२७. शिक्षण–डी. एम्. ई. व्यवसाय–कन्सल्टिंग इंजिनिअर, प्रोजेक्ट स्पेशलायझेशन इन सॉफ्ट ड्रिंक इन्स्टालेशन. वास्तव्य–१६ प्रभुकृपा हौ. सोसायटी, नरीमन रोड, विलेपार्ले, मुंबई–५७. बागकाम, समाजसेवा, ज्योतिषशास्त्राची आवड.
भार्या : **शांता**–माहेर–शांता सदाशिव बर्वे, तारापूर, जि. ठाणे. या बी. ए.,बी. टी. निवृत्त शिक्षिका आहेत. कविता लेखन, नाट्यकथा, संगीत, अभिनय याची आवड. अनेक पारितोषकांच्या मानकरी. समाजसेवेची आवड. पार्ल्यात भरीव समाजकार्य करतात.
५२/८ **अतुल दामोदर**–जन्म २५ ।९ ।६१. शिक्षण–एम्. डी., मुंबई डी. एम. (हृद्रोग). ही एम्. डी. नंतरची उच्च पदवी आहे. विश्वविद्यालयांत फिजिऑलॉजी या विषयात सुवर्णपदक. पॅथॉलॉजी या विषयात डिस्टिंक्शन. वैद्यकीय परिषदांमधे पारितोषिके. क्रिकेटची आवड. कॉलेज संघात सतत पाच वर्षे समावेश. नाट्याभिनय, दिग्दर्शन, वक्तृत्व, काव्यलेखन, यांची आवड. अनेक बक्षिसांचे मानकरी. लोकमान्य

टिळक वैद्यकीय महाविद्यालयात सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून बक्षिस. व्यवसाय—लो. टिळक वैद्यकीय महाविद्यालयात (शीव) लेक्चरर. वास्तव्य—विलेपार्ले.
५३/८ **शरच्चंद्र दामोदर**—जन्म ९ ।१० ।१९६५. शिक्षण—बी.ए., एलएल.बी., एलएल.एम. प्रथम वर्गात पास. कंपनी लॉ आणि ट्रेडमार्क या विषयांत विश्वविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. व्यवसाय—ॲडव्होकेट. सॉलिसिटर फर्ममधे आर्टिकलशिप चालू आहे. वास्तव्य—विलेपार्ले. तबला वादन, वक्तृत्व, समाजसेवेची आवड व कार्य अनेक बक्षिसांचे मानकरी. विलेपार्ले येथील युवा—संस्था 'शेफाली' याचे फाउंडर मेंबर व सेक्रेटरी.
५४/७ **परशुराम गणेश**—जन्म १९२९. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—वैद्यकीय प्रतिनिधी. वास्तव्य—कोल्हापूर.
भार्या : **मंगला**—माहेर—नलिनी लिमये, सांगली.
कन्या :
१) **चारुशिला**—शिक्षण—बी. ए. सासर—चारूशीला प्रदीप रानडे, अहमदाबाद.
२) **मीरा**—माहिती मिळाली नाही.
पुत्र—**गिरीश**—शिक्षण—एम्. एस्सी. गरवारे कॉलेज पुणे येथे लेक्चरर. अविवाहित.
५५/७ **विष्णू गणेश**—जन्म—८ ।१० ।१९३४. राजापूर. शिक्षण—एस्. एस्. सी., डिप्लोमा इन लेदर गुड्स मॅनिफॅक्चरींग मॅनेजमेंट. व्यवसाय—पादत्राणांचे उत्पादन व विक्री कोल्हापूर येथे पादत्राणांचा कारखाना आहे. वास्तव्य—आनंदी. ८४५/२४, ए वार्ड, रिंग रोड, कळंबा, कोल्हापूर—४१६ ००७.
भार्या : १) **कुंदा**—मृत. कन्या ३
कन्या :
१) **सुखदा**—जन्म २० ।९ ।१९६१. शिक्षण—संगीत विशारद. एम. ए. सासर—सुखदा गजानन काणे, इचकरंजी जि. कोल्हापूर.
२) **संध्या**—जन्म १५ ।५ ।१९६३. शिक्षण—संगीत विशारद. सासर—संध्या दिलीप फाटक, पुणे.
३) **सुनीता**—जन्म १५ ।१ ।१९६५. शिक्षण—बी. ए. एम. बी. ए. सासर—सुनीता नितीन क्षीरसागर, पुणे.
भार्या २) : **कुंदा**—माहेर—इन्दू नारायण सहकारी रा. गोवा. मृत २९ ।१० ।१९९०. पुत्र २.
५६/८ **गणेश विष्णू**—जन्म ३ ।३ ।१९७०. शिकत आहे.
५७/८ **चेतन विष्णू**—जन्म १५ ।७ ।१९७१. शिकत आहे.
५८/७ **श्रीकृष्ण गणेश**—जन्म १७ ।१० ।१९३८. शिक्षण—एस्. एस्. सी. राजापूर येथे. व्यवसाय—आयुर्विमा महामंडळामधे टेलिफोन ऑपरेटर. तत्पूर्वी नौदलात वायरलेस ऑपरेटर. नौदलात असताना पूर्वेकडील देशांना भेटी. राष्ट्रीय स्तरावर ॲथेलेटिक पंच म्हणून काम. वास्तव्य—'श्री' प्लॉट नं. ३३, इंदिरानगर, नाशिक—४२२ ००९.
भार्या : **अनुराधा**—माहेर—आशालता श्रीपाद भावे. सातारा.
कन्या :**वैशाली**—जन्म ११ ।५ ।१९६८. शिक्षण—बारावी. पोहोणे स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर सहभाग.
५९/५ **वासुदेव सदाशिव**— #
६०/६ **भिकाजी वासुदेव**— #
६१/५ **सखाराम सदाशिव**— #
६२/५ **अनंत सदाशिव**—वास्तव्य—कोंढे ता. राजापूर व्यवसाय—शेतीवाडी, खोती. इतर माहिती मिळाली नाही.
६३/६ **गोपाळ अनंत**—मृत. व्यवसाय—गुजराथ टाईप फौन्ड्री, गायवाडी गिरगांव येथे नोकरी.
भार्या : **रूक्मिणी**—कन्या-१. पुत्र नाही.
६४/६ **पांडुरंग अनंत**—मृत्यू २४ ।३ ।८०. व्यवसाय—व्यापार, हौशी ज्योतिषी. वास्तव्य—राजापूर.
भार्या : **मालती**—माहेर—गोदुताई गणेश सोहोनी. शेढे, रा. राजापूर.
कन्या :
१) **सुधा**—जन्म १७ ।१ ।१९४३. शिक्षण— स्. एस्. सी. सासर—नीला प्रभाकर चितळे. वास्तव्य—द्वारा- गद्रे केमिकल्स कंपनी, विक्रमनगर, कोल्हापूर.
२) **सिंधु**—जन्म २७ ।१ ।१९५२. शिक्षण—सातवी पास. सासर—अनघा पद्माकर नेने. वास्तव्य—वाडा ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.
३) **रोहिणी**—जन्म १६ ।५ ।१९५६. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर—वैशाली विजय सहस्रबुद्धे. वास्तव्य—मुरूड—जंजिरा. जि. रायगड.

६५/७ **प्रभाकर पांडुरंग**–जन्म २२ ।५ ।१९४७ राजापूर. शिक्षण—एस्. एस्. सी.
व्यवसाय—न्यायखात्यामधे सरकारी नोकरी. सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय रत्नागिरी.
वास्तव्य—२७२६, वरची आळी, अभ्यंकर कंपाउंड, रत्नागिरी.
भार्या : **वैशाली**–आय. टी. आय. रत्नागिरीमधे नोकरी. माहेर—नीरा वामन केळकर, कोळंबे, रत्नागिरी.
कन्या :**मीनल**–जन्म १२ ।८ ।१९७५. शिकत आहे.
६६/८ **प्रशान्त प्रभाकर**–जन्म २३ ।५ ।१९७७. शिकत आहे.
६७/७ **मधुकर पांडुरंग**–जन्म २ ।५ ।१९४५ राजापूर. शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत व्यवसाय—खाजगी नोकरी. वास्तव्य—कोल्हापूर.
भार्या : **मेघा**–माहेर—मोहिनी कुलकर्णी.
शिक्षण—आठवी पास. व्यवसाय—खाजगी नोकरी.
कन्या :**माधवी**–जन्म १९८७.
६८/७ **विश्वास पांडुरंग**–जन्म २६ ।६ ।१९४९ राजापूर. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—सरकारी नोकरी. भातसा धरण विभाग शहापूर जि. ठाणे.
भार्या : **वर्षा**–माहेर—जोशी, देवाचे गोठणे ता. राजापूर. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—सरकारी नोकरी. भातसा धरण विभाग, शहापूर जि. ठाणे.
कन्या :**दीप्ति**–जन्म १९८४. शिकत आहे.
६९/८ **विराज विश्वास**–जन्म १९८१. शिकत आहे.

## घराणे क्र.२


## राजापूर–कोंढे–डहाणू (दत्तक) घराणे

## राजापूर–डहाणू–ठाणे–मुंबई

१/१ **रामचंद्र**–याना पुत्र संतान नव्हते म्हणून त्यांनी कोंढे येथील अभ्यंकरांचा मुलगा कृष्णा (घराणे क्रमांक १ [२९/६]) याला दत्तक घेतला. त्याचे नाव नारायण असे ठेवले. यांची बहिण वसईचे दिवेकर घराण्यांत दिलेली होती.
२/२ **नारायण रामचंद्र (द.आ.)** –मृत्यू १९३९. राजापूर—कोंढेहून हा दत्तक आला. याचे मूळ नाव कृष्णा अभ्यंकर. व्यवसाय—व्यापार डहाणू येथे. ४ऑगस्ट १८९६ रोजी ठाणे कलेक्टर यांनी यांस नदीवर बंधारा घालून पाण्याची सोय केल्याबद्दल आजूबाजूची मसीली गावची १६/१७ एकर जमीन इनाम दिली. त्याची सनद उपलब्ध आहे.
भार्या : **राधाबाई**–कन्या ४ आणि पुत्र ७. माहेर—वेणू रहाळकर, पालघर—माहीम.
कन्या :
१) **ताई**–सासर—सुमती भट, गोरेगावकर चाळ, मुंबई ४.
२) **गोदावरी (माई)** –सासर—जोगळेकर.
३) **सई (अन्नपूर्णा)** –सासर—लेले, विलेपार्ले.
४) **सीता**–सासर—भागवत, पुणे.
३/३ **महादेव नारायण**–जन्म १९०६. मृत्यू १९५०. व्यवसाय—वकिली.
भार्या : **उमा**–माहेर—माहीत नाही.
४/४ **सदाशिव महादेव**–जन्म १९३५.
भार्या : **अलका**–माहेर—कीर्तने, पुणे.
कन्या : **उषा**–जन्म १९६७.
५/५ **उमेश सदाशिव**–जन्म १९७५.
६/४ **अनंत महादेव**–जन्म १९३८. इतर माहिती मिळाली नाही.
७/३ **दत्तात्रय नारायण**–जन्म १९०८. मृत्यू २८ ।३ ।१९८१. व्यवसाय—डॉक्टरी. वास्तव्य—डहाणू रोड स्टेशनजवळ, जि. ठाणे.
भार्या : **सविता**–माहेर—गोदावरी श्रीधर जोशी, अनगांव ता. भिवंडी, जि. ठाणे. मृत्यू ११ ।३ ।१९९०.
कन्या :
१) **वृंदा**–जन्म १९३३. शिक्षण—एम्. ए; एम्. एड्. सासर—वृंदा श्रीपाद दाभोळकर, व्यवसाय—प्राध्यापक. वास्तव्य—१०३, दत्तमंजिल काळोखे नगर, कोल्हापूर—७.
२) **शालन**–जन्म १९३९. मृत्यू १९८१. अविवाहित. शिक्षण—बी. ए.
३) **पुष्पा**–जन्म १९४४. शिक्षण—एम्. ए; एम्. एड्.

## घराणे क्रमांक २


### राजापूर-कोंढे--डहाणू (दत्तक) घराणे
### राजापूर--डहाणू--ठाणे-मुंबई




सासर—यशोधरा सुरेंद्र कांबळी.
४) **अस्मिता**—जन्म १९४७. शिक्षण—बी. ए.
सासर—अस्मिता श्याम शेंडे.
८/४ **रामचंद्र दत्तात्रय**—जन्म २२।९।१९३०. डहाणू येथे. शिक्षण—बी. ए.व्यवसाय—मुंबई महानगरपालिकेत नोकरी. वास्तव्य—१६ सुयश, मंगला हायस्कूलजवळ, ठाणे (पूर्व).
भार्या : **वैदेही**—शिक्षण—एम्. ए; बी. एड्. माहेर—सिंधू दत्तात्रय गोरे, ठाणे. व्यवसाय—मो. ह. विद्यालय, ठाणे येथे शिक्षिका.
९/५ **चंद्रशेखर रामचंद्र**—जन्म १९६८. शिक्षण—१३वी कॉमर्स शिकत आहे.
१०/४ **लक्ष्मण दत्तात्रय**—जन्म १९३२. मृत्यू १९७४. शिक्षण—एम. इ (सिव्हिल) व्यवसाय— कार्यकारी अभियंता.
भार्या : **उषा**—माहेर—उमा—सिव्हिल जज्ज एच. के. करमरकर यांची कन्या.
कन्या :**साधना**—शिक्षण—बी. एस्सी. कॉम्प्युटर.
सासर—आठवले, बेंगलोर.
११/५ **रवींद्र लक्ष्मण**—शिक्षण—बी. ई.(मेकॅ.)
भार्या : **विनिता**—डॉ. साने, पुणे यांची कन्या.
पुत्र—**चिन्मय**—वय वर्षे ४.

## घराणे क्रमांक २

### राजापूर-कोंढे--डहाणू (दत्तक) घराणे
### राजापूर--डहाणू--ठाणे-मुंबई




१२/४ **वसंत दत्तात्रय**–जन्म ४ ।२ ।१९३७. अनगांव, ता. भिवंडी जि. ठाणे. शिक्षण–एम्. ए; एम्. एड्; बी. कॉम्. व्यवसाय–नोकरी डहाणू येथे माध्यमिक शिक्षक. बागायत करणे आवडते. वास्तव्य–'अभ्यंकर निवास' डहाणू रोड, जि. ठाणे ४०१ ६०२.
भार्या : १) **बीना**–एम्. ए; बी. एड्. शिक्षिका.
**माहेर**–कुमुदिनी भालचंद्र साने. देवरूख. मृत्यू १९८२.
२) **अपर्णा**–शिक्षण–बी. कॉम्. एलएल्. बी.
व्यवसाय–वकीली. माहेर–फाटक, सांगली.
प्रथम भार्येची कन्या :**विदुला**–जन्म २४ ।६ ।१९६८.
शिक्षण–बी. ए; एलएल. बी; बी. कॉम.
१३/५ **अनिल वसंत**–जन्म २१ ।१ ।१९७२. शिक्षण चालू आहे.
१४/४ **प्रल्हाद दत्तात्रय**–जन्म २ ।८ ।१९४०.
शिक्षण–बी. एस्सी. बी. एड्. व्यवसाय–वि. प्र. संस्थेचे विद्यालय, बाळकूम, ठाणे येथे मुख्याध्यापक. वास्तव्य–१४/३ समर्थ अपार्टमेंटस्, कळवा, ठाणे ४०० ६०५.
भार्या : **ऊर्जा**–माहेर–सुधा अनंत शिराळकर, उंब्रज, जि. सातारा. अपत्य नाही.
१५/३ **शंकर नारायण**–जन्म १९११. मृत्यू १९८४.
शिक्षण–इंग्रजी ६ वी. व्यवसाय–शेती डहाणू येथे.
भार्या : १) **उषा**–
२) **शांता**–माहेर–बेन्द्रे.
कन्या :
१) **मंगला**–सासर–घाणेकर.
२) **शकुंतला**–सासर–गोडबोले.
३) **विजया**–
१६/४ **मनोहर शंकर**–व्यवसाय–स्वतःचे गॅरेज आहे. मेकॅनिक (स्कूटर). अविवाहित.

१७/४ **धनंजय शंकर**–शिक्षण–एम. कॉम. व्यवसाय–बँक ऑफ महाराष्ट्र, चारोटी येथे नोकरी. इतर माहिती नाही.
कन्या :**सुचित्रा**–वय वर्षे १३. शिक्षण–७ वीत शिकत आहे. पुत्र–**चिन्मय**–वय वर्षे ४.
१८/४ **विद्याधर शंकर**–व्यवसाय–तारापूर येथे बँकेत नोकरी. इतर माहिती नाही.
कन्या :**भाग्यश्री**–
१९/५ **संदिप विद्याधर**–शिक्षण–बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) शिकत आहे.
२०/३ **वामन नारायण**–जन्म–१२ ।६ ।१९१७. शिक्षण–एल्. टी. एम्. (व्ही. जे. टी. आय. मुंबई) व्यवसाय–इंडिया युनायटेड मिल्स् मध्ये स्पिनींग मास्टर. यु. एस. ए., यु. के. ला भ्रमण. वास्तव्य–७/८१ विष्णु प्रसाद, महंत रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.
भार्या : **सुलभा**–जन्म २२ ।११ ।१९२३. माहेर–लीला विष्णू गोखले, विरार.
कन्या :
१) **रत्नप्रभा**–जन्म ३ ।१० ।१९४४. शिक्षण–एम्. ए; बी. एड्. सासर–आशा राजाराम जोशी, विलेपार्ले.
२) **हेमा**–जन्म १७ ।३ ।१९४८. शिक्षण–बी. एस्सी. सासर–हेमा हर्गस, यु. एस्. ए. वास्तव्य–अमेरिका.
३) **लतिका**–जन्म–३० ।१२ ।१९५२. शिक्षण–बी. कॉम. सासर–स्मिता जोशी, विलेपार्ले.
२१/४ **विजय वामन**–जन्म २६ ।११ ।१९५०. शिक्षण–बी. कॉम्; डी. ई. ई. व्यवसाय–एअर इंडिया मध्ये नोकरी.
भार्या : **रेखा**–जन्म १७ ।४ ।१९५३. शिक्षण–बी. ए; बी. एड्. माहेर–वासंती रामचंद्र आपटे.
२२/५ **वैभव विजय**–जन्म ११ ।१२ ।१९७९.
२३/३ **दिगंबर नारायण**–जन्म २५ ।१२ ।१९२०. डहाणू. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–१९७५ मध्ये हायस्कूलमधून निवृत्त, डहाणू. वास्तव्य–डहाणू, जि. ठाणे, डहाणू फोर्ट–४०१ ६०१.
भार्या : **ललिता**–माहेर–सुशीला शांताराम मुळे, पांगरी (रत्नागिरी).
कन्या :
१) **विनया**–जन्म ३ ।६ ।१९५३. सासर–विनया जयंत बर्वे, पुणे.
२) **विनोदिनी**–जन्म २६ ।१ ।१९५६. सासर–विनोदिनी मोरेश्वर रहाळकर, निजामपूर, ता. माणगाव.
२४/४ **विश्वास दिगंबर**–जन्म ११ ।७ ।१९५१. शिक्षण–बी. ए. (ऑनर्स) पर्यन्त. व्यवसाय–स्वतःचा सरकारमान्य टाईपरायटींग क्लास, डहाणू येथे.
भार्या : **वंदना**–माहेर–शकुंतला वामन खरे, सांगली.
२५/५ **मंगेश विश्वास–जन्म–वय** वर्षे ९.
२६/५ **मंदार विश्वास**–जन्म वय वर्षे ५.
२७/४ **विलास दिगंबर**–जन्म १२ ।९ ।१९५४. शिक्षण–बी. ए. नोकरी– (नाझर) जव्हार, जि. ठाणे.
भार्या : **पल्लवी**–माहेर–रेखा प्रभाकर दातीर, बोटाद, सुरेंद्र नगर (गुजराथ).
पुत्र–**१) सुयोग**–वय वर्षे ३.
२८/४ **विकास दिगंबर**–जन्म ३ ।६ ।१९५७. शिक्षण–बी. ए. पर्यंत. स्वतःचा टाइपरायटिंगचा क्लास डहाणू येथे.
२९/३ **विश्वनाथ नारायण**–जन्म १९१८. शिक्षण–५ वी पास. व्यवसाय–शेती. वास्तव्य–मु. पो. डहाणू, जि. ठाणे.
भार्या : १) **कमलाबाई**–माहेर–कमलाबाई काणे, ठाणे.
२) **नलिनी**–माहेर–बिवलकर, मुंबई.
कन्या :**आशा**–जन्म १९५३. शिक्षण–बी. ए. सासर–सुप्रिया सुमंत मेहेंदळे.
३०/४ **अशोक विश्वनाथ**–जन्म ३० ।१२ ।१९४९. शिक्षण–डी. एम्. ई. व्यवसाय–कारखाना.
भार्या : **शुभांगी**–माहेर–शुभांगी विठ्ठल गानू, गोरेगांव. शिक्षण–एम्. ए. चित्रकलेची आवड.
३१/५ **शीतल अशोक**–वय वर्षे १४.
३२/५ **राहुल अशोक**–वय वर्षे १२.
३३/३ **विष्णू नारायण**–जन्म १९२५. शिक्षण–बी. ए., बी. एड. व्यवसाय–निवृत्त हेडमास्तर. १९७७ नंतर शेती डहाणू येथे करतात. वास्तव्य–डहाणू फोर्ट, ता. डहाणू, जि. ठाणे. सामाजिक कार्याची आवड. ब्रदरेन मिशन हॉस्पिटल सोसा.चे सेक्रेटरी. लायन्स क्लब, डहाणूचे डायरेक्टर. ब्राह्मण सभा, डहाणू येथे काही वर्षे

अध्यक्ष.
भार्या : **विजया**–माहेर–द्रौपदी महादेव गानू. मृत.
कन्या :**अंजली**–जन्म १९५३. शिक्षण–एम्. ए.
सासर–अंजली चंद्रकांत रिसबूड, आगाशी ता. वसई. जि. ठाणे.
३४/४ **प्रकाश विष्णू**–जन्म १९५४. शिक्षण–बी. ए.
भार्या : **प्राजक्ता**–माहेर–वैजयंती लक्ष्मण ओक, पालघर.
कन्या : **रसिका**–वय ७ वर्षे.
पुत्र–**रोहन**–वय २ वर्षे.
३५/४ **प्रदीप विष्णू**–जन्म १९५५. शिक्षण–बी. ए; एल् एल् बी.
भार्या : **माधुरी**–माहेर–माधुरी मधुकर आमडेकर, बोरिवली, मुंबई.
पुत्र १) **महुआ**–वय ४ वर्षे. २) **सौरभ**–वय १ वर्षे.

## घराणे क्रमांक ३

## राजापूर–कोंढे–लिंब (गोवा) –अकोला


या घराण्याचे मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यातील कोंढे येथील या घराण्यातील गोविंद धोंडदेव हे लिंबहून अकोला येथे आले अशी माहिती मिळाली, परंतु लिंब–गोवा जि. सातारा येथून अकोल्या सारख्या दूर ठिकाणी त्यांचे प्रयाण का व कसे झाले याची माहिती मिळू शकली नाही. तसेच 'सीताराम नारायण हे लिंब गोवा येथे आले' असा उल्लेख बाळकृष्ण गणेश यांच्या त्र्यंबकेश्वराच्या लेखातून सापडतो. सध्या हयात असलेल्या लिंबगोवा आणि अकोला येथील कुलबंधूकडून जी माहिती मिळाली तिच्या आधारे वंशावळी आणि काही बंधूंची माहिती पुढे दिली आहे. इतरांची माहिती मिळू शकली नाही.

## कुळधर्म व कुलाचार

या घराण्यात लग्न, मुंज व गर्भाधान प्रित्यर्थ गोंधळ व बोडण घालण्याची पद्धत आहे. मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदेस म्हणजे देवदिवाळीस वडे–घारगे यांचा नैवेद्य देवीस घालतात. पौष महिन्यातील एका मंगळवारी तांदुळाचा जोगवा ४ घरी मागतात. लग्नानंतर बोहर यात्रा, पुरणा वरणाचा नैवेद्य, श्री सूक्ताचा अभिषेक, सुवासिनी, ब्राह्मण भोजन व त्यानंतर देवीची ओटी भरणे अशी प्रथा आहे. तसेच आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून विजया दशमी पर्यन्त अखंड दीप, त्रयोदशोगुणी विडा अर्पण करणे व कोणी एकाने धान्य फराळ करणे अशी चाल आहे.

१/१ **धोंडदेव**– #
२/२ **गोविंद धोंडदेव**– #
३/३ **सदाशिव गोविंद**– #
४/४ **धोंडोपंत सदाशिव**– #
५/५ **गोविंद धोंडदेव**–हे अकोला येथे लिंबहून आले.
६/६ **विनायक गोविंद**– #
७/६ **दत्तात्रय गोविंद**– #
८/७ **यशवंत दत्तात्रय**–जन्म १५ ।८ ।१९१८. मृत्यू ३ ।६ ।१९८७. शिक्षण–मराठी ४थी.
व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–गोखले लॉजमागे, रेल्वे स्टेशनजवळ, अकोला.
भार्या : **प्रभावती**–माहेर–मथुरा गजानन भावे, वर्धा.
कन्या :
१) **जयश्री (रजनी)** –जन्म ६ ।९ ।१९४३.
सासर–रजनी श्रीपाद जोशी, राहणार–मोहनजी सुंदरजी रोड, आनंद ट्रेडिंग कंपनीजवळ, वागळे इस्टेट, ठाणे.
२) **रेखा**–जन्म १९६०. सासर–रेखा प्रशांतराव पिंपळखरे, राहणार–तिवारी यांचा वाडा, अरूण डेरी जवळ, राईट टाऊन, जबलपूर (म.प्र.)
९/८ **विष्णू यशवंत**–जन्म ७ ।११ ।१९५१.
शिक्षण–बी. कॉम. इंग्रजी शॉर्टहॅण्ड परीक्षा पास.
व्यवसाय–जिल्हा सत्र न्यायालय, अकोला येथे स्टेनोग्राफर. वास्तव्य–गोखले लॉज जवळ, जुने शहर, अगरवेस, अकोला.
भार्या : **विद्या**–माहेर–विद्या श्रीपाद परचुरे.
कन्या :
१) **सुजाता (गौरी)** –जन्म २१ ।१ ।१९८०. शिकत आहे.
२) **स्मिता (टिना)** –जन्म ३ ।८ ।१९८१. शिकत आहे.
३) **सफला (हेमा)** –जन्म ७ ।१ ।१९८५.

## घराणे क्रमांक ३
## राजापूर कोंढे–लिंबगोवा--अकोला



१०/८ **कृष्ण यशवंत**–जन्म २ ।२ ।१९५५. शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–रेल्वेत लिपिक. इलेक्ट्रीकल उपकरणे दुरूस्तीची आवड. वास्तव्य–अकोला.
भार्या : **संध्या**–माहेर–संध्या दत्तात्रय गोखले, अकोला.
पुत्र–१) **मंदार (प्रसाद)** –जन्म ८ ।२ ।१९८५.
२) **केदार (गिरीराज)** –जन्म १६ ।११ ।१९८८.
११/८ **दत्तात्रय यशवंत**–जन्म २० ।६ ।१९५६. शिक्षण–एम. कॉम. ॲपिअर्ड. व्यवसाय–एम्. एस्. इ. बी. मध्ये नोकरी. बॅडमिंटन खेळाची आवड. वास्तव्य–केला प्लॉट, जठार पेठ, अकोला.
भार्या : **अंजली**–जन्म २५ ।१२ ।१९६१. माहेर–अंजली पुरुषोत्तम भिडे.
कन्या : **अमृता (कीर्ती)** --जन्म २६ ।९ ।१९८६.
१२/८ **संजय (सदाशिव) यशवंत**–जन्म ३१ ।७ ।१९६४. शिक्षण–एम्. कॉम्. (फर्स्ट -क्लास) व्यवसाय–एल्. आय. सी. अचलपूर (परतवाडा) येथे विकास अधिकारी. वास्तव्य–गोखले लॉजमागे, अकोला.
भार्या : **रजनी**–माहेर–अर्चना मधुकर सहस्त्रबुद्धे. खामगाव.
१३/६ **वासुदेव गोविंद**–जन्म १९००. मृत्यू ३१ ।१२ ।१९८०. व्यवसाय–शिवणकाम. 'रतनलाल बाळराम फर्म' मध्ये मुनीमजीची नोकरी. वास्तव्य–अकोला.
भार्या : **गंगाबाई**–जन्म १९१२. मृत्यू २५ ।९ ।१९७५. माहेर–गंगाबाई दिगंबर आठवले, खामगाव.
१४/७ **दामोदर वासुदेव**–जन्म १९२६ खामगाव येथे. शिक्षण–मराठी ४थी पास. व्यवसाय–सावतराम मिल मधून सेवा निवृत्त. वास्तव्य–जोगळेकर प्लॉट, अकोला, विदर्भ.
भार्या : **नलिनी**–माहेर–द्वारका दामले, वर्धा.
१५/८ **विनायक दामोदर**–जन्म १९५९. वास्तव्य–अकोला.
भार्या : **विजया**–माहेर–विजया धाबेकर. मृत.
कन्या :**कांचन**–जन्म १९८४. पुत्र–**प्रविण**–जन्म १९८२.
१६/७ **अनंत वासुदेव**–जन्म ३० ।११ ।१९३० खामगाव येथे. शिक्षण–इयत्ता ९ वी पास. व्यवसाय–सर्व प्रकारचे मसाले, मिरची, हळद व सिझनल घरगुती उपयोगी पदार्थ बनवून विकण्याचा गृहउद्योग. त्यामुळे मसालेवाले अभ्यंकर म्हणून प्रसिद्ध. पूर्वी ठाकूर आणि कंपनीमधे सेल्समन म्हणून काम करीत होते. परंतु मिळणाऱ्या पगारात ७/८ जणांचा संसार चालविणे कठीण झाल्यामुळे व शिक्षणही बेताचेच असल्यामुळे फावल्यावेळात बुधवारी सुट्टीच्या दिवशी काहीतरी करावे या विचाराने आईने जादा केलेल्या मसाल्याची विक्री करून काही पैसे मिळवायचे. त्यावेळी तयार मसाला विकत घेण्याची पद्धत नव्हती. तथापि नाउमेद न होता मसाल्याचे नमुने फुकट वाटले. त्यानंतर काही वर्षांनी लोकांना अभ्यंकरांच्या मसाल्याचा दर्जा कळला. त्यानंतर काही वर्षांनी चक्र बदलले आणि गिऱ्हाईक स्वतःच मसाल्यासाठी त्यांच्याकडे हेलपाटे घालू लागले. नोकरी सुटल्यावर आपला पूर्ण वेळ देऊन 'बेरार ट्रेडिंग' कॉर्पोरेशनच्या पायरीशी लहानसे दुकान थाटले. घरातील सर्व मंडळी धंद्यात साथ देऊ लागली आणि केवळ सात रूपये भांडवलावर सुरू केलेला धंदा आज उर्जितावस्थेत आला आहे. आज मागणी प्रचंड वाढली असून पुरवठा करणे जड जात आहे. वास्तव्य–'जयहिंद चौक', अकोला, विदर्भ.
भार्या : **सुमती**–माहेर–शकुंतला. रा. निंबोली, धामणगाव.
कन्या :
१) **लता**–जन्म १९५९. सासर–लता आनंदराव चिपळूणकर, भिवंडी.
२) **विश्वला**–जन्म १९६३. सासर–विश्वला विनितराव जोशी, तेल्हारा.
१७/८ **किशोर अनंत**–जन्म २६ ।२ ।१९६१. व्यवसाय–मसाल्याचा व्यापार. वास्तव्य–जयहिंद चौक, अकोला.
भार्या : **भाग्यश्री**–माहेर–भाग्यश्री अरूण कुलकर्णी, छिंदवाडा, जि. जबलपूर.
१८/८ **सुधीर अनंत**–जन्म–१९६५. व्यवसाय–मसाल्याचा उद्योग.
१९/८ **मोहन अनंत**–जन्म १९६९. व्यवसाय–वडिलांचा मसाल्याचा गृहउद्योग.

२०/७ **वसंत वासुदेव**—जन्म १९३५. खामगाव येथे. शिक्षण—मॅट्रिक पर्यन्त. व्यवसाय—'वसंत गृहउद्योग'—सुगंधी उटणे व शिकेकाई निर्मिती व विक्री. वास्तव्य—नवीन गोडबोले प्लॉट, अकोला.
भार्या : **मालिनी**—माहेर—संध्या देवस्थळे, शहाडोल (म.प्र.)
कन्या :**मंगला**—जन्म १९६७.
२१/८ **सुनिल वसंत**—जन्म १९६५.
व्यवसाय—वडिलांच्या गृहउद्योगात मदत.
२२/८ **प्रकाश वसंत**—जन्म १९६९.
व्यवसाय—वडिलांच्या गृहउद्योगात मदत.
२३/८ **मिलिंद वसंत**—जन्म १९७१.
व्यवसाय—वडिलांच्या गृहउद्योगात मदत.
२४/३ **नारायण गोविंद**— #
२५/४ **सीताराम नारायण**—हे लिंबगोवा येथे आले असा पुरावा सापडला.
२६/५ **गणेश सीताराम**— #
२७/६ **बाळकृष्ण गणेश**—मृत्यू १८ ।८ ।१९८३.
भार्या : **राधाबाई**—माहेर—बनुताई नामजोशी, सातारा.
कन्या :
१) **गोदावरी**—सासर—वसुधा श्रीपाद गोखले. २६/४, एरंडवणा, पुणे.
२) **काशीताई**—सासर—उषा शंकरराव आठवले, गुहागर जि. रत्नागिरी.
२८/७ **माधव बाळकृष्ण**—जन्म १ ।५ ।१९३४ लिंब येथे. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—किराणा दुकान, प्रिंटींग प्रेस, न्युज पेपर एजन्सी इ. वास्तव्य—१९४८ साली गांधी वधानंतर झालेल्या जाळपोळीत सर्व घरदार जाळल्यानंतर पुन्हा नव्याने लिंब येथे घर बांधले. वास्तव्य—मु. पों. लिंब, ता. जि. सातारा.
भार्या : **लक्ष्मी**—माहेर—सुशीला शिवराम कुंटे, पुणे.
२९/८ **रामचंद्र (शेखर) माधव**—जन्म ७ ।४ ।१९६४. शिक्षण—प्रिंटींग टेक्नॉलॉजिचा डिप्लोमा, लिंब येथे प्रेसमध्ये काम.
३०/८ **गुणेश माधव**—जन्म १८ ।८ ।१९६८. शिक्षण—१० वी पास. व्यवसाय—वडिलांच्या व्यवसायात मदत.
३१/६ **भास्कर गणेश**— #
३२/६ **मोरू गणेश**— #
३३/६ **दत्ता गणेश**— #
३४/६ **शंकर गणेश**— #
३५/६ **लक्ष्मण गणेश**— #
३६/५ **वामन सीताराम**— #
३७/५ **केशव सीताराम**— #

## घराणे क्रमांक ४


## मधुमते-अभ्यंकर घराणे

### आडिवरे-राजापूर

### राजापूर-नाशिक-पुणे-औरंगाबाद

१/१ **लक्ष्मण**—हा ज्ञात मूळपुरूष.
२/२ **बळवंत लक्ष्मण**—प्राथमिक शिक्षक होते. ज्योतिषाचा अभ्यास होता. निवृत्त होताना डेप्युटी एज्यु. ऑफिसर या हुद्यावर निवृत्त झाले. वास्तव्य—नाशिक.
३/३ **कृष्णराव बळवंत**—हे पी. डब्ल्यू. डी मध्ये हेडक्लार्क होते. मृत्यू १९२०.
भार्या : **इंदू**—माहेर—मायले, नाशिक.
कन्या :
१) **द्वारका**—सासर—गोखले, मृत.
२) **इंदुमती**—अविवाहित. वास्तव्य—पुणे.
४/३ **काशीनाथ बळवंत**—विमा तज्ञ, जन्म १९०४. मृत्यू २३ ।९ ।१९५१.
भार्या : **उमाबाई**—जन्म १९१२. मृत्यू १९६४. माहेर—मोरेश्वर महादेव जोशी, जळगाव.
५/४ **शरदचंद्र काशीनाथ**—जन्म ८ ।९ ।१९३० नागपूर. शिक्षण—जी. डी. सी. नोकरी—एस. एस. सी. बोर्ड, औरंगाबाद येथे सेवानिवृत्त. वास्तव्य—सुयोग बंगला, स्टेट बँक कॉलनी, उस्मानपूरा, औरंगाबाद.
भार्या : **सरिता**—माहेर—सुशीला केळकर. पिता—डॉ. परशुराम महादेव केळकर, लिंबगोवा, सातारा.

## घराणे क्रमांक ४
## मधुमते-अभ्यंकर
## आडिवरे-राजापूर घराणे
## राजापूर--नाशिक--पुणे--औरंगाबाद




कन्या :
१) **शिरीषबाला**–जन्म १२ ।१ ।१९६२. शिक्षण–एम्. कॉम. ट्यूशन क्लास चालवितात.
२) **पद्मा**–जन्म ५ ।३ ।१९६७. शिक्षण–बी. कॉम्., टेक्सटाईल्स डिझाइनर.

**६/५ समीर शरदचंद्र**–जन्म १८ ।७ ।१९७२. शिक्षण–डी.ई.ई. व्यवसाय–एन्.आर.बी. औरंगाबाद येथे नोकरी.

**७/४ विनयकुमार काशीनाथ**–जन्म १० ।५ ।१९३६ नाशिक येथे. शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–बांधकाम, ट्रान्सपोर्ट आणि भागिदारीत वर्कशॉप. व्ही. के. अभ्यंकर अँड कंपनी, पुणे. संगीत, प्रवास, आजारी माणसांची कामे करणे याची आवड. तसेच कार्टून्स काढण्याची आवड. वास्तव्य–'श्री' अपार्टमेंट, मॉडेल कॉलनी, ज्ञानेश्वर पादुका चौक, पुणे–१६.
भार्या : **संगीता**–माहेर–शैलजा नारायण साने, मालेगाव, नाशिक.
कन्या :**मधुवंती**–जन्म ३ ।११ ।१९७३. शिकत आहे.

**८/५ राहुल विनयकुमार**–जन्म १३ ।११ ।१९७५.

**९/४ हेमचंद्र काशीनाथ**–जन्म ९ ।९ ।१९३८. व्यवसाय–बँक ऑफ बडोदा, तळोजा, जि. धुळे. मॅनेजर म्हणून नोकरी. पोहणे, ब्रीज, बुद्धीबळ इ. खेळांची आवड. शिवाय पायी फिरण्याचा छंद. १९७२ साली ३५० मैलांची नर्मदा प्रदक्षिणा पायीच पूर्ण केली. समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या ११ मारूतींची पायी प्रदक्षिणा पूर्ण केली. हिमालयातील १४५०० फूट उंची वरील हेमकुंड–तीर्थस्थान, भीमा शंकर व त्रंबकेश्वर येथे पायी प्रवास. वास्तव्य–तळोजा जि. धुळे. सध्या गंगापूर

रोड, नाशिक येथे स्थायिक.
भार्या : **सुवर्णा**–माहेर–नलिनी अनंत केळकर, पेण (रायगड) पुत्र–३.
१०/५ **मंदार हेमचंद्र**–जन्म १४ ।९ ।१९७०. शिक्षण–बी.कॉम्.
११/५ **निलेश हेमचंद्र**–जन्म १३ ।९ ।१९७२. शिक्षण–डी.एम्.ई. करीत आहे.
१२/५ **चंदन हेमचंद्र**–जन्म ३ ।९ ।१९७६. शिक्षण–इ. ७ वी.
१३/४ **वसंत काशीनाथ**–जन्म १९४१. शिक्षण–बी. आर्क. स्वतंत्र व्यवसाय पुणे येथे. वास्तव्य–प्लॉट नं. १४/१५, शीलाविहार कॉलनी, कर्वे रस्ता, पौंडफाटा, पुणे.
भार्या : **स्वप्ना**–माहेर–सुमंगला मुंडले रा. ठाणे.
१४/५ **ओंकार वसंत**–जन्म १९७९ इ. ४थीत.
१५/३ **गंगाधर बळवंत**–मृत १९७५. अविवाहित. इतर माहिती नाही.
१६/३ **शंकर बळवंत**–जन्म २९ ।१ ।१९१२. शिक्षण–बी. ए. ऑनर्स. नोकरी–पोलिस खात्यात डेप्यु. सुपरिटेंडंट म्हणून निवृत्त. अध्यात्मिक वाचन आणि भजनाची आवड. शासन सेवेत असताना राष्ट्रपती पोलिस पदकाचे मानकरी. वास्तव्य–३७/३ "उत्तरा", प्रभात रोड, ६वी गल्ली, एरंडवणे, पुणे–४.
भार्या : **शांताबाई**–माहेर–शांता शंकर गोडबोले, पुणे. जन्म सप्टें १९१३. मृत्यू एप्रिल १९८७.
कन्या :**सुधा**–जन्म १४ ।५ ।१९३७. शिक्षण–जी. एफ. ए. एम. सासर–डॉ. सीमा सदाशिव लेले. वास्तव्य–कौस्तुभ, विष्णूनगर, ठाणे.
१७/४ **श्रीराम (सुधीर) शंकर**–जन्म २६ ।३ ।१९४२. शिक्षण–डी.ए.इ. व्यवसाय–किर्लोस्कर ब्रदर्स, पुणे येथे सेल्स मॅनेजर वास्तव्य–३७/३ उत्तरा, प्रभात रोड, ६वी गल्ली, एरंडवणे, पुणे–४.
भार्या : **सुमिता**–जन्म १९४६. शिक्षण–एम. ए. माहेर–लीला केळकर, महू (मध्य प्रदेश)
कन्या :**शिल्पा**–जन्म २४ ।१२ ।१९७४.
पुत्र–**भरत**–जन्म १४ ।३ ।१९८१.
१८/४ **गिरीश शंकर**–जन्म २३ ।९ ।१९५०. शिक्षण–बी. इ. (मेकॅ.); एम. बी. ए. व्यवसाय–इलेक्ट्रॉनिक्सच्या व वैद्यकीय उपकरणांचा विक्री व्यवस्थापनाचा व्यवसाय फॉर्टीबस कं, टिळक रस्ता, पुणे. वास्तव्य–२३ शिवपार्वती, चिंतामणी सोसायटी, कर्वेनगर, पुणे–५२.
भार्या : **कांचन**–पिता–डॉ. वसंत मल्हार कोटबागी, पुणे.
कन्या : **पूर्वा**–जन्म ४ ।८ ।१९७९. शिक्षण–इ. ६ वीत शिकत आहे.